ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १९ जानेवारी, १९६६ | अंक १

O 100-1 HIN

## नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये



नकल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी, लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७६...

# विविध माहिती

**नवे कीटकनाशक औषध**—रशियातील एका जीवशास्त्रज्ञाने जपानमधील शास्त्रज्ञांच्या सहकार्याने एक नवीन प्रकारचे कीटकनाशक औषध शोधून काढले आहे. हे औषध मनुष्याला अगर प्राण्याला घातक नाही. फक्त कीटकसृष्टीलाच ते घातक आहे. पिकांवरील अनेक प्रकारच्या कीडींचा नाश करण्यासाठी विविध प्रकारची रासायनिक औषधे सध्या वापरण्यात येत असतात. पण त्यांच्या वापरात धोक्याचे काही थोडे प्रमाण असते. नवीन औषध वापरण्यात कसलाही धोका नाही, असा दावा करण्यात येत आहे.

**खाण उघडण्यासाठी भाडेपट्टा**—भारत सरकारच्या परवानगीने सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्या कंपनीला म्हैसूर सरकारने चुनखडीच्या खाणी उघडण्यासाठी भाडेपट्टा करून दिला आहे. भाडेपट्टा २० वर्षे मुदतीचा असून खाणी उघडण्यासाठी २९१ एकरांची जमीन कंपनीला देण्यात आली आहे. गुलबर्गा जिल्ह्यातील काही खेड्यांतून ही जमीन पसरलेली आहे. खाणी उघडताना चुनखडीशिवाय इतर खनिजे कंपनीला आढळून आल्यास ती गोष्ट कंपनीने सरकारच्या नजरेस आणावयाची आहे आणि ती खोदण्याची कंपनीची इच्छा असल्यास तसे करण्यापूर्वी सरकारची पुन्हा परवानगी घ्यावयाची आहे.

**केसांच्या निर्यातीमुळे परदेशीय चलनांची प्राप्ती**—तिरुपती येथील देवस्थानाला येणारे लाखो भाविक यात्रेकरू डोक्याचे मुंडन करतात. त्यामुळे कमी-जास्त लांबीच्या व विविध रंगांच्या मानवी केसांचे ढीग नेहमी जमत असतात. त्यांची निर्यात करून देवस्थान दरसाल २० ते २५ लाख रुपये मिळवू शकेल आणि सरकारलाही परदेशीय चलनाची प्राप्ती होईल. एका अमेरिकन कंपनीने केसांपासून टोप तयार करण्याचा कारखाना तेथेच काढण्याची तयारी दाखविली आहे. पाश्चिमेकडील देशांतून विविध रंगांच्या केसांच्या टोपांना चांगली मागणी आहे. आतापर्यंत जमलेल्या केसांचा अधूनमधून लिलाव करून देवस्थान दरसाल १२ लाख रुपये मिळवीत असे.

**जेट विमानाच्या एंजिनाची चाचणी**—बंगलोर येथे जेटवर चालणाऱ्या विमानांना लागणारे एंजिन तयार करण्यात येत आहे. अशा एंजिनाची तेथे नुकतीच चाचणी घेण्यात आली असता ती यशस्वी झाली आहे. संरक्षण साहित्याच्या उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न भारत जारीने करीत आहे. त्या प्रयत्नातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**आर्थिक बहिष्काराचा परिणाम**—ब्रिटनला लागणाऱ्या तंबाखूपैकी सुमारे एक तृतियांश तंबाखूचा पुरवठा ऱ्होडेशियातून होत असतो. ऱ्होडेशियावरील आर्थिक बहिष्कारात भाग घेतल्यामुळे ब्रिटनला दुसऱ्या देशांकडून तंबाखू घ्यावी लागणार आहे. बहिष्कार दीर्घ काळ चालू राहिल्यास ब्रिटन भारताकडून अधिक तंबाखू आयात करण्याची शक्यता आहे.

**२०० एकरांत मक्याचे बियाणे**—बुलढाणा जिल्ह्यातील २०० एकरांच्या एका शेतात संकरित मक्याच्या बियाणाची लागवड करण्यात येणार आहे. हे काम राष्ट्रीय बी-बियाणे मंडळातर्फे करण्यात येत आहे. मलकापूर तहसिलीतील कुंड ह्या गावाजवळील जमिनीची ह्या शेतीसाठी निवड करण्यात आली आहे. जमीन भिजविण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे ४ विजेच्या मोटारी पुरविण्यात येणार आहेत.

**भिलई येथील नवी झोतभट्टी**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यात उभारण्यात आलेली नवी झोतभट्टी उत्पादन करू लागली आहे. पोलाद तयार करणारी ही भारतामधील सर्वांत मोठी भट्टी असून तिची उत्पादनक्षमता ५०० टनांची आहे. भिलई येथील पोलादाचा कारखाना रशियाच्या मदतीने उभारण्यात आला असून त्याच्या विस्ताराचे काम चालू आहे.

**हिमालयाचा अभ्यास करा**—लखनौ येथे भरविण्यात आलेल्या शास्त्रज्ञांच्या परिसंवादात बोलताना सुप्रसिद्ध भूस्तर शास्त्रज्ञ डॉ. डी. एन. वाडिया म्हणाले, की हिमालयातील कितीतरी भूप्रदेशाबद्दल अद्याप पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नाही. तरुण भूस्तर शास्त्रज्ञांनी हिमालयाच्या अभ्यासासाठी स्वतःला वाहून घ्यावे; अशा अभ्यासातून खूप नवी माहिती उजेडात येण्यासारखी आहे.

**भूमिगत स्फोटांची नोंद**—बंगलोरपासून ४० मैलांवरील एका ठिकाणी भूमिगत अणुस्फोटांची नोंद करणारे भारतामधील पहिले केंद्र उभारण्यात येत आहे. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीचे प्रमुख डॉ. रामनाथन ह्यांनी ही माहिती सांगितली. केंद्राचे काम लवकरच सुरू होणार आहे. केंद्रात बसविलेल्या उपकरणांच्या साह्याने स्फोटाची शक्ती आणि अंतर ह्यांचे मापन करता येईल; त्याशिवाय छोट्या भूकंपांची नोंदही त्यावर करता येईल.

**खताच्या उत्पादनास विलंब**—नेवेली येथे स्थापन करण्यात आलेल्या खताच्या कारखान्यात चालू वर्षाच्या मध्यापासून प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होण्याची शक्यता आहे. कारखान्याची उभारणी पूर्ण होऊन त्याची चाचणीही घेण्यात आली होती. परंतु चाचणीच्या वेळी काही तांत्रिक दोष आढळून आले. हे दोष काढून टाकण्यासाठी कारखाना पुरविणाऱ्या कंपनीचे साह्य घेण्यात येत आहे.

**तांदूळ सडण्याच्या सहकारी गिरण्या**—महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यात तांदूळ सडण्याच्या ५० सहकारी गिरण्या तावडतोब स्थापन करण्याचे ठरविले आहे. गिरण्या दर तासाला अर्धा टन भात भरडू शकतील. प्रत्येक गिरणीसाठी १ लाख रुपये भांडवली खर्च येणार आहे. भांडवलाची उभारणी सरकारी कर्जे, सरकारी भाग भांडवल आणि समासदांचे भाग भांडवल ह्यांच्या साह्याने करण्यात येणार आहे.

**४ कोटी रुपयांची बिले थकली**—भारत सरकारच्या दळणवळण खात्याच्या अहवालात देण्यात आलेल्या माहितीप्रमाणे टलिफोनची ४ कोटी रुपयांची बिले अद्याप वसूल झालेली नाहीत. विशेष म्हणजे बिले योग्य वेळी न भरणारांत सरकारी खात्यांची संख्याच अधिक आहे. मार्च अखेर ३·९ कोटी रुपयांची बिले वसूल व्हावयाची होती. त्यांपैकी ४५·९ टक्के बिले खाजगी ग्राहकांची आणि ५४·१ टक्के बिले सरकारी खात्यांची होती.

**हिंदी कापडाची इटालीला निर्यात?**—हिंदमधील कापडाची निर्यात इटालीला करण्याची शक्यता अजमावण्यासाठी इटालीचे एक प्रतिनिधी मंडळ लवकरच भारतात येणार आहे. दक्षिण इटलीमध्ये काही प्रकारच्या हिंदी कापडाला भरपूर बाजारपेठ लाभेल अशी अपेक्षा आहे. पश्चिम युरोपात हिंदी कापडाची निर्यात करण्यास प्रतिबंध आहे; परंतु इटालीने ही बंदी उठविली आहे. त्याचा फायदा घेणे भारताला शक्य आहे.

# अर्थ

बुधवार, १९ जानेवारी, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दारिद्र्य : भारतामधील आणि अमेरिकेतील

आशियातील भारतासारख्या देशांचे दारिद्र्य महशूर आहे. अमेरिकेतही दारिद्र्याने पिडलेली कुटुंबे आहेत; पण भारताचे दारिद्र्य आणि अमेरिकेमधील दारिद्र्य ह्यांची तुलनासुद्धा करता येण्यासारखी नाही. चार अगर अधिक माणसे असलेले एखादे कुटुंब घेतले आणि त्याची अमेरिकेमधील वार्षिक प्राप्ती ३ हजार डॉलर्स अगर त्यापेक्षा कमी असली तर अमेरिकेत ते कुटुंब दरिद्री गणले जाते. रुपयाच्या चलनात ३ हजार डॉलर्सची किंमत सुमारे १४ हजार रुपये होते. भारतामधील एखाद्या कुटुंबाची प्राप्ती दरमहा १ हजार रुपये असेल तर ते दरिद्री गणले जाणार नाही. उलट, त्याचा समावेश वरिष्ठ प्राप्तीच्या वर्गात करण्यात येईल. अमेरिकेत ५ कुटुंबांपैकी एका कुटुंबाचेच वार्षिक उत्पन्न ३ हजार डॉलर्सपेक्षा कमी आहे. अमेरिकेतील दरिद्री कुटुंब युरोपमध्येसुद्धा बऱ्या स्थितीतील म्हणून गणले जाईल. निरनिराळ्या देशांतील वेतने, भाडी आणि इतर खर्चांच्या बाबी ह्यांच्यात फरक असतोच. अमेरिकेतील निरनिराळ्या शहरांतून केस कापण्याचे दर ५ रुपयांपासून १० रुपयांपर्यंत असलेले आढळून येतात, आणि त्याशिवाय नापिताला १। रुपया दक्षिणा द्यावी लागते ती वेगळीच. तथापि, कसाही विचार केला तरी अमेरिकेतील गरिबी आणि इतर देशांतील गरिबी ह्यांत फार मोठे अंतर आहे. अमेरिकेत कोणत्याही माणसाच्या अन्न, वस्त्र आणि निवारा ह्यांच्यासारख्या प्राथमिक गरजा भागविल्या जातात. रस्त्यावरून हिंडणारे भुकेकंगाल कोणी दिसत नाहीत. अमेरिका हा भांडवलशाही समाजरचनेचा देश आहे. पण ह्या देशातील बेकार लोकांना २६ आठवड्यांपर्यंत अगर कधीकधी जास्तही काल बेकारी विम्याचा फायदा मिळतो. १९६१ साली अमेरिकेतील बेकारांचे सरासरी वार्षिक उत्पन्न २,३०० डॉलर्स अथवा दरमहा ९२०. रुपये होते. ह्या अल्पशा माहितीवरून दारिद्र्याची व्याख्या देशकालमानाप्रमाणे कशी वेगळी असू शकते ते लक्षात येते.

## हिंदी व्यापाऱ्यांना व उद्योगपतींना आफ्रिकेत भरपूर वाव

हिंदमधील व्यापाऱ्यांचे व उद्योगधंदेवाल्यांचे एक सदिच्छा मंडळ सप्टेंबर महिन्यात आफ्रिकेतील काही देशांचा दौरा करून परत आले आहे. भारतामधून गेलेले हे दुसरे मंडळ आहे. मंडळाने आपल्या दौऱ्याची फलश्रुती म्हणून असा निष्कर्ष काढला आहे, की हिंदी व्यापाऱ्यांना आपला माल विकण्यास अगर उद्योगपतींना उद्योगधंदे काढण्यास आफ्रिकेतील नवोदित देशांत भरपूर वाव आहे. परंतु हे साध्य करण्यासाठी हिंदी धंदेवाल्यांना पुष्कळ प्रयत्न करावे लागतील आणि कल्पकता दाखवावी लागेल. कोणत्या प्रकारचा माल कोठे पाठवावा आणि कोणते उद्योगधंदे कोठे काढावे ह्यांविषयी नीट विचार करण्यात आला पाहिजे. भारताच्या सदिच्छा मंडळाचा अहवाल मुंबईमध्ये नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. आपल्या दौऱ्यात मंडळाने निरनिराळ्या आफ्रिकी देशांतील सरकारी व बिनसरकारी आर्थिक संस्थांना भेटी दिल्या. अहवालात असे म्हटले आहे, की भारताच्या सध्याच्या परिस्थितीत आफ्रिकी देशांना मदत देणे भारताला कितपत शक्य होईल असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. कारण, भारताजवळची आर्थिक साधनसामग्री मर्यादित आहे; आणि त्यावरही हल्ली फार ताण पडलेला आहे. परंतु ग्राहकोपयोगी अनेक प्रकारच्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांच्या बाबतीत मदत करता येणे शक्य कोटीतील आहे. हे उद्योगधंदे मुख्यतः छोट्या प्रमाणांवरील आणि मध्यम प्रमाणांवरील असू शकतील. अशा उद्योगधंद्यांतून तयार होणाऱ्या मालाला आफ्रिकेत हजर बाजारपेठ सुलभतेने मिळू शकेल. तथापि, जे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणांवर काढल्यासच परवडू शकतील अशा उद्योगधंद्यांना मुळीच वाव नाही असे मात्र नाही. त्यांची उभारणीही काही प्रमाणात करता येण्यासारखी आहे.

## धान्य उतरून घेण्यासाठी देशी यंत्रसामग्री

हिंदमधील दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर गहू पुरविण्याचे मान्य केले आहे. हा गहू बोटींतून उतरून घेण्याची व्यवस्थाच अपुरी पडण्याचा संभव आहे. अन्नधान्य त्वरित उतरून घेण्यासाठी भारत सरकारच्या अन्नखात्याने कलकत्त्यातील किदरपोर गोदीत स्वयंचलित यंत्रसामग्रीची व्यवस्था केली आहे. यंत्रसामग्रीसाठी २० लाख रुपये खर्च आला असून ती तयार करण्याचे काम हावडा येथील एका हिंदी एंजिनिअरिंग कंपनीने केले आहे. भारतातील अशा प्रकारची ही पहिलीच व्यवस्था असून तिच्या साह्याने दर तासाला १७५ टन धान्य बोटीवरून धक्क्यावर उतरून घेता येते. बोट बंदराला लागल्यापासून ती रिकामी करीपर्यंत दररोज सुमारे १५ हजार रुपये द्यावे लागतात. नव्या यंत्रसामग्रीमुळे ह्या खर्चात बरीच बचत होणार आहे. अमेरिकेहून येणाऱ्या धान्याच्या बोटी जलद रिकाम्या करण्यासाठी या यंत्रसामग्रीचा फार चांगला उपयोग होत आहे. तिच्या वापरामुळे वेळाची आणि परदेशीय चलनाचीही बचत होत आहे. बोटींतून धान्य उतरविण्याचे काम गोदीतील हमालांकडून करवून घेण्याचा शिरस्ता आहे; पण कधीकधी हा मार्ग उपलब्ध नसतो. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत हमालांकडून धान्य हलविणे अशक्य होते. नव्या यंत्रसामग्रीच्या साह्याने पावसाळ्यातही धान्य उतरून घेणे शक्य होईल. बोटी बंदरांत थांबवून ठेवण्यासाठी द्यावा लागणारा आकार डॉलर्सच्या चलनातच द्यावा लागतो. भारताच्या सध्याच्या परदेशीय चलनाच्या टंचाईच्या काळात प्रत्येक वाचविला जाणारा डॉलर हा मिळविल्यासारखाच आहे. तथापि अशा यंत्रसामग्रीमुळे गोदीत काम करणाऱ्या हमालांच्या रोजगारावर परिणाम होणार नाही ह्याची दक्षता घेतली पाहिजे.

## लाल बहादुर शास्त्री

ताश्कंदच्या ऐतिहासिक जाहीरनाम्याच्या पाठोपाठ तेथील कामगिरी पार पाडणाऱ्या लाल बहादूर शास्त्रींच्या आकस्मिक मृत्यूची वार्ता कानी आली, आणि प्रत्येक जण शोकविव्हल झाला. लाल बहादुर शास्त्रींचे नाव स्वतंत्र भारताच्या लोकाग्रणींत अजरामर राहील, असेच त्यांचे कर्तृत्व आहे. शाळामास्तरचा लहानपणीच पोरका झालेला सुपुत्र, स्वतंत्र भारताच्या सर्वोच्च स्थानी विराजमान झाला; एका जबाबदारीच्या जागेवरून दुसरी, अशा क्रमाने ते आपल्या चारित्र्याच्या, कर्तव्यनिष्ठेच्या, बळाने सर्वांस प्रिय झाले. लाला लजपतराय ह्यांच्या सर्व्हंट्स ऑफ दि पीपल सोसायटीचे सभासद ह्या नात्याने त्यांनी सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला. ते रेल्वे मंत्री असताना अरिलायूर अपघात झाला, त्याची जबाबदारी व्यक्तिशः स्वतःची मानून त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. सार्वजनिक नीतिमत्तेचा हा आदर्श त्यांच्या थोरवीचा निदर्शक आहे.

पंडित नेहरूंच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या मानाने लाल बहादुर शास्त्री अगदीच साधेसुधे असल्यामुळे त्यांना पंतप्रधानाची वस्त्रे पेलतील किंवा नाही, अशी शंका व्यक्त करण्यात येत होती; संकटेही भयंकर वाढली होती. पाकिस्तानी आक्रमणाने, तर सर्वांना हवालदिल करून टाकले होते. अशा प्रसंगी ह्या अवतारी पुरुषाने कमालीचे धैर्य दाखवून आणि प्रभावी नेतृत्व करून भारताचे पुनरुज्जीवन केले; भारतीयांना जगात मानाचे स्थान प्राप्त करून दिले; १९६२ च्या त्या नामुष्कीची आठवण बुजवून टाकली. अन्नधान्याची आणि परराष्ट्रीय हुंडणावळीची परिस्थिती इतकी बिकट नसती, तर त्यांना ह्याहिपेक्षा अधिक परिणामकारक शांतता प्रस्थापित करता आली असती. आपल्या देशाचे सर्व हितसंबंध अबाधित राखून पाकिस्तानशी सलोख्याचे संबंध निर्माण करण्याच्या अवघड कामगिरीचा त्यांच्यावर विलक्षण ताण पडला, हे उघड आहे. त्यांच्या सहधर्मचारिणी ललितादेवी ह्यांनीही जनमनात आदराचे स्थान मिळविले होते. त्यांचे हसतमुख, प्रसन्न व्यक्तिमत्त्व सर्वांच्या परिचयाचे झाले होते. त्यांच्यावरील आपत्तीची कल्पनाही असह्य होते. त्यांच्या दुःखात सबंध राष्ट्र सहभागी आहे, ह्याची सत्यता घरोघरी, पदोपदी दिसून येत आहे.

---

## काकासाहेब गाडगीळ

सार्वजनिक कार्यकर्त्यांपैकी आणखी एक असामान्य पुढारी आपल्यातून नाहीसा झाला आहे. काकासाहेब गाडगिळांनी स्वत्व न सोडता महाराष्ट्राची व देशाची स्वार्थत्यागपूर्वक जी महान सेवा केली, तिचे आकलन करणेही सामान्य माणसाला कठीण आहे. त्यांच्या कार्याची विविधता आश्चर्यकारक आहे. स्टेट बँकेच्या व्हाइस चेअरमनपदाचा राजीनामा देणारे, पंजाबच्या राज्यपालपदावरून मुदतीपूर्वीच, सर्व कामगिरी पार पाडून, खुषीने निवृत्त होणारे काकासाहेब, महाराष्ट्रासाठी स्वतःच्या राजकीय जीवनाचा बळी देण्यास पुढे सरसावलेले काकासाहेब, आपल्या बुद्धीचा आणि स्थानाचा समाजाला मुक्त हस्ताने फायदा मिळवून देणारे काकासाहेब, हे अखेरपर्यंत सार्वजनिक काका म्हणूनच वावरले. सामान्य माणसांतच व सामान्य माणसांसाठीच त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. धकाधकीच्या काळातही ते लेखनवाचनासाठी सवड काढू शकले; त्यांची ग्रंथनिर्मिती नुसत्या लेखनांत मग्न असणारांनाही लाजवणारी आहे.

## कंपन्यांच्या ठेवींवर नियंत्रणे—रिझर्व्ह बँकेची उपाययोजना

बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवी वाढत चालल्या आहेत; तेव्हा, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्यावर नियंत्रण घालणे रिझर्व्ह बँकेला आवश्यक वाटून त्याप्रमाणे जाहीरनामाही काढला आहे. ज्या कंपन्यांना ही बंधने लागू आहेत, त्यांतून बँका, विमा कंपन्या, फक्त स्वतःच्या सभासदांकडूनच ठेवी घेणाऱ्या कंपन्या, हायर-परचेसचा व्यवहार करणाऱ्या कंपन्या, इत्यादी वगळण्यात आल्या आहेत. ( हायर-परचेसचा व्यवहार करणाऱ्या कंपन्यांसाठी स्वतंत्र बंधने जाहीर करण्यात आली आहेत. )

तावडतोब परत करण्याच्या अटीच्या किंवा १२ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारण्याची अशा कंपन्यांना बंदी करण्यात आली आहे; रिन्यू केलेल्या ठेवीची मुदतही १२ महिन्यांपेक्षा कमी असता कामा नये. सध्या चालू असलेल्या डिमांड ठेवी किंवा १२ महिन्यांखालील मुदतीच्या ठेवी जरूर ती योजना करून नव्या नियमात आणून बसविल्या पाहिजेत. एखाद्या कंपनीने तसा अर्ज केल्यास रिझर्व्ह बँक अशा योजनेच्या पूर्तीसाठी मुदतवाढ देऊ शकेल.

"ठेवी स्वीकारणे आहेत" अशी जाहिरात त्या त्या कंपनीच्या मॅनेजरच्या सहीने व अधिकाराने प्रसिद्ध झाली पाहिजे. कोणत्या तारखेला जाहिरातीचा मसुदा मॅनेजरने मंजूर केला, हे त्यात नमूद करायला हवे. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात सारांश, कंपनी व तिच्या सबसिडिअरीज करीत असलेला व्यवहार, पूर्वीच्या तीन वर्षांचे करापूर्वीचे करानंतरचे नफे, ह्या तीन वर्षी जाहीर केलेले डिव्हिडंड, हिशेब तपासनीसांनी तपासलेल्या ताज्या ताळेबंदाच्या तारखेची देणी ( वसूल भांडवल, मोकळे रिझर्व्हज, ठेवी, गहाण किंवा लोनच्या तारणावर घेतलेली कर्जे, तात्पुरती कर्जे इतर कोणतीही उचल ) ह्यांचा तपशील जाहिरातीत छापला पाहिजे.

हे नियम अमलात आल्यानंतर प्रथम जाहिरात करण्यापूर्वी कंपनीने रिझर्व्ह बँकेकडे ऑडिट झालेला ताळेबंद धाडायला हवा; त्यानंतरही वेळोवेळी ताळेबंद पाठविले पाहिजेत. कंपनीने पावती कोणत्या प्रकाराने द्यावी, पावतीत काय तपशील असावा, हेही रिझर्व्ह बँकेने ठरवून दिले आहे. कंपनीला सादर करावयाच्या वार्षिक अहवालात डायरेक्टर बोर्डाने खालील तपशील पुरविला पाहिजे :—( १ ) ज्यांनी आपल्या ठेवी मागितल्या नाहीत किंवा ज्यांच्या ठेवी कंपनीने दिलेल्या नाहीत, अशा ठेवीदारांची संख्या; ( २ ) अशा ठेवींची एकूण रक्कम १० लक्ष रु. पेक्षा जास्त भरत असेल, तर ठेवी परत करण्याबाबत डायरेक्टर बोर्ड काय उपाय करीत आहे, त्यांचा तपशील.

---

## मिडलंड बँकेत नाण्यांचे प्रदर्शन

मिडलंड बँकेने लंडनमधील आपल्या एका कचेरीच्या आवारात ब्रिटिश-नाण्यांचे एक प्रदर्शन भरविले होते. जुन्या नाण्यांचे मानाने नवी नाणी कमी प्रतीच्या बनावटीची आहेत; असे प्रेक्षकांचे मत पडले. हे प्रदर्शन बँकेच्या इतर शाखांतूनही फिरविण्यात येणार आहे. बँकेच्या 'पब्लिक रिलेशन्स' खात्याचा हा उपक्रम आहे.

---

## रजिस्टर्ड पत्रासाठी हात बनावटीचा कागद

रजिस्टर्ड पत्राच्या पाकिटाचा कागद परदेशी बनावटीचा असल्यामुळे तो दुर्मिळ होत आहे. म्हणून, त्याच्याऐवजी हात बनावटीचा कागद वापरून पाकिटे करण्याचे पोस्ट खात्याने ठरविले आहे.

## इलेक्ट्रॉनिक्सच्या उद्योगधंद्याचा विस्तार

दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या शास्त्रज्ञ आणि उद्योगपती ह्यांच्या संयुक्त परिषदेत इलेक्ट्रॉनिक्सच्या उद्योगधंद्याची वाढ करण्यासंबंधी चर्चा करण्यात आली. शास्त्रज्ञांच्या एका अभ्यास गटाने अशी सूचना केली आहे की ह्या उद्योगधंद्याचा समतोल विकास साधण्यासाठी येत्या १० वर्षांत १८० कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात यावे. इतकी भांडवलाची गुंतवणूक करण्यात आली तर १० वर्षांच्या अखेरीस दरसाल २८० कोटी रुपयांची उत्पादनक्षमता ह्या उद्योगधंद्याला प्राप्त होऊ शकेल आणि सूक्ष्म व गुंतागुंतीची इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करणाऱ्या देशात भारताला स्थान मिळेल. परिषदेत चर्चा करणाऱ्यांसाठी म्हणून एक अहवाल तयार करण्यात आला होता. तो तयार करण्यासाठी अनेक शास्त्रज्ञांनी हातभार लावला होता. अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की इलेक्ट्रॉनिक्स उद्योगधंद्याचा भारतामधील सध्याचा विस्तार बेताचा आहे. भाभा कमिटीने येत्या दहा वर्षांतील गरजांचा अभ्यास करून असा अंदाज केला आहे की ह्या कालात १,६०० कोटी रुपये किमतीची इलेक्ट्रॉनिक्सची अद्ययावत साधने भारताला लागणार आहेत. इतकी गरज भागविण्याचे सामर्थ्य ह्या धंद्याच्या सध्याच्या अवस्थेला झेपण्यासारखे नाही. १,६०० कोटी रुपयांच्या साधनांपैकी ७८० कोटी रुपयांच्या साधनांची तर एकट्या संरक्षण खात्यालाच गरज आहे. गेल्या महायुद्धानंतर ह्या उद्योगधंद्याची पाश्चिमात्य देशात अभूतपूर्व प्रगती झालेली आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मताने तर मानवी समाजाच्या जीवनाचा तांत्रिक पायाच ह्या धंद्यामुळे नव्याने घातला गेलेला आहे. मागासलेल्या अविकसित देशात ह्या उद्योगधंद्याची अद्याप नीटशी सुरुवातही झालेली नसली तरी त्याचे महत्त्व ओळखणे अगत्याचे आहे.

## सर्कसमधील नोकरांच्या परिस्थितीचा विचार

सर्कसमध्ये काम करणाऱ्या नोकरांच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी भारत सरकारने एक कमिटी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. सर्कसमधील नोकरांचा प्रश्न हा नेहमीच्या कामगारांच्या प्रश्नासारखा नाही. गेल्या वर्षी लोकसभेत सर्कसमधील नोकरांचे प्रश्न औद्योगिक कलह कायदा आणि कामगार नुकसान-भरपाई कायदा ह्यांच्या कक्षेत आणण्यासाठी एक बिनसरकारी बिल मांडण्यात आले होते. परंतु त्यावरील चर्चा अपुरीच राहिली. सर्कसमधील नोकर आपल्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी अशी मागणी दीर्घ काळ करीत आहेत. अगदी अलीकडे त्यांनी आपल्या परिस्थितीसंबंधीचे एक निवेदन मध्यवर्ती सरकारच्या मजूर मंत्र्यांकडे पाठविले आहे. दहा वर्षांपूर्वीही हा प्रश्न लोकसभेत उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळचे मजूरमंत्री श्री. खंडुभाई देसाई ह्यांनी लोकसभेला असे सांगितले होते की, ह्या विषयासंबंधी राज्य सरकारांची मते अजमावण्यात येत आहे. तथापि त्यानंतर ह्या नोकरांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले गेलेले नाही. सध्या भारतात ४८० सर्कस कंपन्या असून त्यांत काम करणारांची संख्या १० हजारापर्यंत आहे. पण त्यांना वर उल्लेख केलेले दोन्ही कायदे लागू नाहीत. अर्थातच त्यांच्या कामाच्या परिस्थितीवर कोणत्याही प्रकारचे कायद्याचे नियंत्रण नाही. नोकरांच्या अनेक गाऱ्हाण्यांपैकी काही अतिशय जाचक ठरण्यासारखी आहेत. वेळेवर पगार मिळत नाही, रजेसंबंधी काही नियम नाहीत, अपघाताचा विमा उतरलेला असत नाही, आणि अपंग झाल्यास नुकसान–भरपाईही दिली जात नाही, अशा त्यांच्या प्रमुख तक्रारी आहेत. कामगार वर्गाच्या हितरक्षणासाठी करण्यात आलेले कायदे ह्या नोकरांना लागू करण्यापूर्वी त्यांच्या परिस्थितीची पहाणी करणे आवश्यक आहे.

## गुजरातमधील उद्योगधंद्यांसाठी नवे जळण

उद्योगधंद्यांना लागणारी शक्ती विजेच्या रूपाने अगर इतर इंधनाच्या रूपाने मिळते. पण ही शक्ती कारखान्याच्या नजीकच उपलब्ध असेल असे नाही. म्हणूनच विजेची औद्योगिक शक्ती अगर कोळशासारखे जळण दूर अंतरावरून आणणेही पुष्कळदा भाग पडते. पूर्व भारतामधील कारखान्यांना कोळशाचा पुरवठा कमी अंतरावरून करावा लागतो; तशी महाराष्ट्र-गुजरातसारख्या पश्चिम भागाची परिस्थिती नाही. ह्या भागातील कारखान्यांना लागणारा कोळसा खुष्कीने अगर दर्याने वाहून आणावा लागतो. औद्योगिक जळणाचा हा प्रश्न गुजरातपुरता नव्या मार्गाने सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खंबायतच्या आखातामध्ये मिळणाऱ्या नैसर्गिक वायूच्या साठ्यापासून कंडेन्सेट नावाचे एक द्रवरूपी जळण गुजरातला मिळू शकेल. त्यामुळे कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्याची नैमित्तिक झळ गुजरातमधील कारखान्यांना ह्यापुढे कमी प्रमाणात लागेल. ह्या नवीन द्रव जळणाचे उत्पादन रोज ४० टनांपर्यंत सध्या करण्यात येत आहे. ह्या पदार्थापासून काही प्रकारचे कृत्रिम तंतु आणि कृत्रिम रबरही तयार होऊ शकते. जळण द्रवरूप असल्यामुळे ते साठविण्यासाठी कोळशाइतकी जागा लागत नाही आणि त्याची वाहतूक करणेही सोपे जाते. खंबायतमधील नैसर्गिक वायूचे उत्पादन जसजसे वाढत जाईल तसतसे नव्या जळणाचे उत्पादनही वाढू लागेल. गुजरात राज्याच्या वीज-मंडळाला खंबायत येथील नैसर्गिक वायूचा पुरवठा ध्रुवरन वीजकेंद्रासाठी करण्यात येत आहे. गुजरातमधील कारखान्यांचा विस्तार होण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्यात औद्योगिक जळणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. नव्या प्रकारचे हे जळण इंजिनांसाठी आणि औद्योगिक भट्ट्यांसाठीही उपयुक्त ठरले आहे. परंतु त्यासाठी जळणावर काही संस्कार करावे लागतील.

## संस्कारित अन्नपदार्थांच्या निर्यातीचे उद्दिष्ट

संस्कारित अन्नपदार्थांच्या निर्यातीसंबंधी विचार करण्याकरता बंगलोर येथे परिसंवाद भरविण्यात आला होता. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत भारतामधून २० कोटी रुपये किमतीचे संस्कारित अन्नपदार्थ निर्यात करता येणे शक्य आहे असे परिसंवादात झालेल्या चर्चेवरून दिसून आले. संस्कारित अन्नपदार्थांच्या दोन्ही गटांनी मिळून हे उद्दिष्ट गाठावयाचे आहे. पहिल्या गटात डबाबंद फळे आणि भाज्या ह्यांचा समावेश असून दुसऱ्या गटात बिस्किटे आणि तत्सम इतर पदार्थ ह्यांचा समावेश आहे. पहिल्या गटातील अन्नपदार्थांच्या निर्यातीचा हिस्सा ६.६६ कोटी रुपयांचा ठरविण्यांत आला असून उरलेला निर्यात माल दुसऱ्या गटातील असणार आहे. पहिल्या गटातील मालाच्या निर्यातीची किंमत सध्या अवघी ८५ लाख आहे. या गटातील माल म्हणजे डबाबंद फळे, मुरांबे, फळांचे रस, टिकवलेल्या व सुक्या भाज्या होत. ह्या धंद्याची वाढ होण्यासाठी साखरेचा नियमित आणि पुरेसा पुरवठा आवश्यक असतो. परंतु गेल्या वर्षी डबाबंद फळे व भाज्या तयार करणाऱ्या कारखान्यांना साखरेचा पुरवठा अपुरा व अनियमित झाला अशी तक्रार परिसंवादात करण्यात आली. ह्या धंद्याच्या विस्तारासाठी निदान २० लाख रुपयांचे परदेशीय चलन पुरविण्यात यावे म्हणजे जरूर ती यंत्रसामुग्री वा इतर साधने आयात करता येईल अशी मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे धंद्यासाठी लागणाऱ्या टिनचा पुरेसा पत्राही पुरविण्यात यावा असे सुचविण्यात आले. दुसऱ्या गटातील अन्नपदार्थांच्या कारखान्यांना सध्या कच्च्या मालाच्या तुटवड्याला तोंड द्यावे लागत आहे. पीठ, तेल, तूप न चिकटणारा कागद, पुठ्ठ्यांचा कागद, इत्यादी मालाची चणचण ह्या कारखान्यांना भासत आहे

## कर्ज मिळविण्यासाठी होणारा खर्च

### " इनकम टॅक्ससाठी वजा केला पाहिजे "

### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

मद्रास राज्यातील एका पब्लिक लिमिटेड कंपनीने १९४९-५० मध्ये इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून ४० लक्ष रुपयांचे कर्ज घेतले. त्या बाबतीत स्टँप ड्यूटी, रजिस्ट्रेशन फी, वकील फी, इत्यादींसाठी कंपनीला ८४,६३३ रु. खर्च आला. ही रक्कम इनकम टॅक्सच्या आकारणीच्या वेळी वजा करण्यात यावी, असे कंपनीने पुढील वर्षीच्या कर आकारणीच्या वेळी इनकम टॅक्स अधिकाऱ्याला सांगितले. हा खर्च भांडवली स्वरूपाचा आहे; कारण भांडवल मिळविण्यासाठी तो केलेला आहे असे इनकम टॅक्स अधिकाऱ्याचे म्हणणे पडले; आणि त्याने तो खर्च वजा करण्यास नकार दिला. इनकम टॅक्स अपेलेट ट्रिब्यूनलला हे मत मान्य झाले नाही, तेव्हा मद्रास हायकोर्टाकडे हे प्रकरण गेले. हायकोर्टाने इनकम टॅक्स अधिकाऱ्याचे म्हणणे उचलून धरले तेव्हा कंपनीने सुप्रीम कोर्टाकडे अपील केले. " कर्ज हा टिकाऊ स्वरूपाचा फायदा नसल्यामुळे, कंपनीने जो खर्च केला तो काही विशेष मुदतीपुरता पैशाचा उपयोग मिळविण्यासाठीच केला, असेच मानले पाहिजे. मिळालेल्या भांडवलाचा उपयोग कसा करण्यात आला, भांडवली खर्चासाठी की इतर खर्चासाठी, ह्याची चिकित्सा गैरलागू आहे; कर्जाचा वापर बदलत्या परिस्थितीवर अवलंबून राहील " असे म्हणून सुप्रीम कोर्टाने कंपनीच्या बाजूने अपिलाचा निवाडा केला. कर्ज मिळविण्यासाठी होणारा खर्च हा रेव्हेन्यू खर्च असून इनकम-टॅक्स कायद्याप्रमाणे तो वजा घालण्यास पात्र आहे, असे ठरविले.

---

## रूरकेला पोलाद कारखान्याचा विस्तार

रूरकेला येथील कारखान्याचा विस्तार करण्याची योजना हाती घेण्यात आलेली आहे. ती पूर्ण झाल्यावर १८ लाख टन पोलाद निर्माण करता येईल; परंतु ह्या विस्तारापेक्षाही अधिक मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याची योजना तयार करण्याचे आवाहन पश्चिम जर्मन सरकारने हिंदुस्थान स्टील लि. ह्या कंपनीला केले आहे. असेच आवाहन भारत सरकारच्या पोलाद खात्यालाही करण्यात आले आहे. हिंदुस्थान स्टीलकडून ह्या बाबतची योजना आल्यावर जर्मन पोलाद तज्ज्ञ रूरकेला कारखान्याच्या विस्तारासाठी अधिक पैसा पुरविण्यासंबंधी वाटाघाटी करण्यास तयार आहेत. ह्या कारखान्याची अंतिम उत्पादन-क्षमता २५ लाख टन ठेवावी की ३५ लाख टन ठेवावी ह्यासंबंधीच मुख्यत: निर्णय करावयाचा आहे. गेल्या १८ महिन्यांत ह्या कारखान्याने चांगली कामगिरी केली आहे.

---

## गुजरात राज्यामधील राहत्या घरांचा तुटवडा

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस गुजरात राज्यात राहत्या घरांचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर उद्भवण्याचा संभव आहे. त्याचे स्वरूप अन्नधान्याच्या टंचाईपेक्षाही अधिक तीव्र असेल. १९७१ च्या सुमारास गुजरात राज्यातील लोकांची राहण्याची सोय करण्यासाठी ४ लाख अधिक बिऱ्हाडांच्या जागा बांधाव्या लागतील. परंतु तज्ज्ञांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे त्या सुमारास अवघे ४५ हजार गाळेच बांधले जाण्याची शक्यता आहे. ४ लाख राहण्याच्या जागा बांधावयाच्या झाल्यास त्यासाठी १६० कोटी रुपये खर्च करावे लागतील. हे उद्दिष्ट दूरच राहिले; पण १७ हजार जागा बांधून झाल्या तरी समाधान मानावे लागेल आणि त्यासाठीही १७ कोटी रुपये खर्च करावे लागतील.

## उष्णतेच्या साह्याने वीज निर्माण करणारी केंद्रे

उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणारी जी केंद्रे रशियाच्या साह्याने उभारण्यात येणार आहेत, त्यांचे नमुने निश्चित करण्यासाठी एक नवी संघटना स्थापन करण्यात येणार आहे. अशा केंद्रांचे प्रमाणीकरण करण्याची पद्धत रशियाने स्वीकारलेली आहे. त्याचप्रमाणे, वीजप्रवाहाचे वाटप करण्याची पद्धतही रशियाच्या साह्याने सुधारण्यात येणार आहे. ह्या कार्यक्रमात साह्य करण्यासाठी ५ रशियन तंत्रज्ञ भारतात येणार आहेत. त्यांपैकी तिघेजण ह्यापूर्वीच आले आहेत. उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्रांचे नमुने निश्चित करणे आणि त्याप्रमाणे त्यांची यंत्रसामग्री तयार करणे ह्या दोन्ही बाबतीत स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे; त्या मार्गावरील हे पहिले पाऊल आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत भारताच्या वीजपुरवठ्यात ७५ लाख किलोवॅटची आणखी भर घालण्याचे ठरविण्यात आले आहे. ह्या विजेच्या उत्पादनासाठी राखेचे जास्त प्रमाण असलेल्या हलक्या दर्जाच्या कोळशाचा वापर करण्यात येणार आहे. भारतात सापडणारा काही ठिकाणचा कोळसा असा हलक्या प्रतीचा आहे. त्याचा उपयोग करून चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्रांची एक मालिकाच स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे. संकल्पित केंद्रांच्या उभारणीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वाचा परिणाम घडून येईल. वीजकेंद्रांच्या बांधणीचे नमुने ठरविणारी संघटना पाणी-पुरवठा व वीज मंडळाच्या अखत्यारात काम करील. तीन वर्षांच्या अवधीनंतर ह्या संघटनेचे सर्व कामकाज हिंदी एंजिनिअर्स बघू लागतील.

---

## भिलई कारखान्यातील पोलादाची निर्यात

मध्यप्रदेशात भिलई येथे रशियाच्या मदतीने काढण्यात आलेला पोलादाचा कारखाना निर्यात करू लागला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील ह्या कारखान्याने १९६४ च्या शेवटच्या नऊ महिन्यांत ९१ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविले. ह्या अवधीत कारखान्याने सुदानला ३० हजार टन बिडाचे लोखंड व १२ हजार टन रेल्वेचे रूळ निर्यात केले. संयुक्त अरब प्रजासत्ताकालाही कारखान्याने काही माल निर्यात केला आहे. चालू वर्षात कारखाना अधिक परदेशीय चलन मिळवू शकेल अशी अपेक्षा आहे. सुदान आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्यांच्या पोलादी मालांच्या काही गरजा कारखाना संपूर्णतया पुरवू शकेल असा विश्वास कारखान्याच्या मॅनेजरनी व्यक्त केला आहे. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याला काही विशिष्ट प्रकारचे पोलाद लागते. अशा प्रकारच्या पोलादाचे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. जरूर त्या प्रकारचे पोलाद तयार करण्यात आले असून सध्या त्याची चाचणी घेण्यात येत आहे. आवश्यक त्या तांत्रिक परीक्षेला ते उतरल्यास हिंदुस्थान कारखान्याच्या सर्व गरजा देशातल्या देशातच भागविणे शक्य होईल आणि विशेष प्रकारच्या पोलादासाठी खर्च होणारे परदेशीय चलनही वाचेल. कारखान्याची उत्पादनक्षमता वाढवून ती २५ लाख टनांपर्यंत नेण्यासाठी विस्ताराचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. तो आता पूर्ण झाला असून त्याचे सर्व भाग उत्पादनास सज्ज झालेले आहेत. तथापि, अजून निरनिराळ्या भागांत जुळतेपणा आणावयाचा आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील ह्या कारखान्याने केलेली प्रगती सार्वजनिक मालकीच्या विभागाच्या यशाची निशाणी म्हणता येईल.

### फ्रान्समध्ये संततिनियमन कायद्यास मान्यता नाही

लोकसंख्येची वाढ आटोक्यात ठेवण्याचा एक मार्ग म्हणजे संततिप्रतिबंध होय, हे बहुतेक सर्व देशांतून मान्य झाले झालेले आहे. विशिष्ट पद्धतीबद्दल किंवा त्यांच्या अंमलबजावणीबद्दल फारतर मतभेद असतील. फ्रान्समध्ये मात्र जननाचे प्रमाण वाढण्यास कायदाच प्रोत्साहन देतो, अशी परिस्थिती आहे. बहुपुत्री कुटुंबांना सरकारकडून विशेष मदत मिळते. संतातनियमनाचा प्रचार करणे, हा तेथे गुन्हा आहे. पहिल्या महायुद्धात फ्रान्सची एवढी मोठी लोकसंख्या मृत्युमुखी पडली, की ती संख्या पुनः पूर्वीसारखी होण्यासाठी उपाययोजना करणे त्या देशाला भागच पडले. तरी सुद्धा, आज फ्रान्समधील प्रत्येक कुटुंबातील अपत्यांची सरासरी संख्या फक्त दोनच आहे. ह्याचा अर्थ, संततिनियमनाचा चोरून अवलंब केला जातो, हे उघड आहे. फ्रान्समध्ये दरसाल सुमारे ५,००,००० पेक्षा जास्त गर्भपात होतात, हा त्याचाच परिणाम आहे. एकीकडे न्यूयॉर्क स्टेटमध्ये संततिनियमनाची साधने अविवाहितांनाही मोफत पुरविली जात असताना फ्रान्समध्ये कायदाच प्रजावाढीचा पुरस्कर्ता असावा, हे विचित्र दिसते.

### उंदरांविरुद्ध मोहिमेत बँकांची मदत

भारतामधील अन्न धान्याच्या उत्पादनातील बराच मोठा भाग उंदरांच्या भक्ष्यस्थानी पडतो. उंदरांविरुद्ध करण्यात यावयाच्या मोहिमेत आता बँकांची मदत घेण्यात येणार आहे. धान्याच्या ज्या गुदामांना औषधी द्रव्यांची धुरी दिलेली नसेल त्या गुदामांत धान्याचा साठा करण्यात आला असल्यास त्यांच्या तारणावर बँकांनी कर्जे देऊ नयेत असा आदेश भारत सरकार बँकांना देण्याचा संभव आहे. उंदरांकडून होणाऱ्या अन्नाच्या नासाडीबद्दल असा अंदाज करण्यात आला आहे, की अन्नधान्यांच्या उत्पादनापैकी ८ टक्के धान्य उंदीर घशाखाली घालतात. एका माणसाचे अन्न सहा उंदीर फस्त करतात असा हिशेब करण्यात आला आहे. उंदरांप्रमाणेच पक्षी व कृमिकीटकही गुदामांमधील धान्याचा नाश करतात. सेंट्रल वेअरहौसिंग कार्पोरेशनही त्यांच्याविरुद्ध उपाय योजना करीत आहे. पक्ष्यांना मारण्यात येत नाही. मात्र त्यांना भिववून पळवून लावण्यात येते.

### बसमधील फुकटे उतारू

कलकत्ता आणि हौरामधील बस उतारूंपैकी १०% उतारू तिकीट न काढता प्रवास करतात, असे प. बंगाल स्टेट ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशनने नुकतेच सांगितले. त्यामुळे, दररोज १५,००० रुपयांचे नुकसान होते. कॉर्पोरेशन दररोज ७५० बसेस चालविते व त्यांतून १३ लक्ष उतारू जातात. त्यांच्या तिकिटांचे उत्पन्न १,५०,००० रु. मिळते.

### दि सांगली बँक लि.

दि सांगली बँक लि., सांगली या बँकेस सन १९६५ साली अंदाजे रु. १,९२,००० इतका नफा झाला असून सदरचा फायदा नेहमीच्या सर्व खर्चाची तरतूद करून व बँकेच्या इमारती वगैरेंवरील घसारा वजा करून झाला आहे. गेल्या काही वर्षांचा फायदा विचारात घेता चालू साली नफ्यात वाढ झालेली असून बँकेच्या वाढत्या खेळत्या भांडवलाशी फायद्याचे प्रमाण प्रगतीकारक आहे.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
१, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर ( १० ) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,५६,७५,००० |
| ठेवी | ... | ३९,१४ ३१,००० |
| खेळते भांडवल | ... | ९१,४८,३५,००० |

भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. बु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४२/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-७-६५ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरात खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

**मुदतीच्या ठेवी**

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

## परदेशांना होणाऱ्या अमेरिकेच्या मदतीला मर्यादा

अमेरिकेतील मॅसेच्युसेटस येथील तांत्रिक संस्थेचे प्रमुख डॉ. मिलिकेन ह्यांनी अमेरिका परदेशांना देत असलेल्या मदतीत आणखी वाढ होण्याची फारशी शक्यता नाही असे जाहीर केले आहे. आर्थिक नियोजनाविषयी दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या दोन दिवसांच्या परिसंवादात ते बोलत होते. अमेरिकेच्या परदेशीय मदतीच्या कार्यक्रमासंबंधी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की अमेरिकेकडून मदत घेणाऱ्या सर्वच देशांच्या मदतींत अधिक वाढ होण्याची शक्यता फारच कमी आहे. अमेरिकेच्या आर्थिक प्रगतीचा वेग चांगला असला तरी आता तो आणखी वाढण्याचा संभव नाही; शिवाय अमेरिकेच्या लष्करी खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. अमेरिका व्हिएटनामच्या युद्धात शांतता स्थापन करण्याचे प्रयत्न करीत आहे. पण त्यांना उत्तर व्हिएटनामकडून योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही, तर लष्करी खर्चात वाढ होणे अपरिहार्यच मानले पाहिजे. १९४७ पासून अमेरिका परदेशांना आर्थिक मदत देत आहे. मदत घेणाऱ्या देशांचा सामाजिक आणि आर्थिक विकास व्हावा ह्या अपेक्षेने अमेरिका मदत देत असते. पण ह्या मदतीच्या पोटात दीर्घ कालावधीने फलित होणारे काही स्वार्थी हेतूही आहेत, ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. अमेरिकेकडून मिळणारी आर्थिक मदत ही अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाचे एक हत्यार आहे, ही गोष्ट मुद्दाम लक्षात ठेवली पाहिजे. अमेरिकेकडून मिळणारी मदत निरनिराळे देश निरनिराळ्या प्रकाराने राबवितात. भारतात अमेरिकेकडून मिळणारी मदत मुख्यतः सामाजिक आणि आर्थिक भरभराटीसाठी वापरण्यात येत आहे. परंतु भारत सोडून इतर अनेक देशांत लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी तिचा उपयोग करण्यात येत आहे.

अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील देशांची आर्थिक घडी सावरून घरण्यासाठी मार्शल योजना अमलात आणली. पण त्या मदतप्रमाणे देण्यात आलेले आर्थिक साह्य आणि विकासाच्या मार्गावर पहिली पावले टाकणाऱ्या देशांना देण्यात आलेले साह्य ह्यात फरक आहे. पूर्वी वसाहती म्हणून गणल्या गेलेल्या देशांना दिलेला आधार असे ह्या मदतीचे स्वरूप होते. पूर्व युरोपातील देशांनाही अमेरिकेने मदत दिलेली आहे. पोलंड आणि युगोस्लाव्हिआ सारख्या देशांचे रशियावरील परावलंबित्व कमी व्हावे ह्या हेतूने ही मदत देण्यात आली होती.

## शास्त्रीय उपकरणांचे प्रदर्शन

चंदीगड येथे भरविण्यात आलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्ताने शास्त्रीय उपकरणांचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मध्यवर्ती सरकारचे वीज आणि पाणी पुरवठा मंत्री श्री. के. एल. राव म्हणाले की चांगल्या उपकरणांचा उपयोग करणे ही एक कला आहे आणि शास्त्रही आहे. मापन यंत्रांची घडण करण्यावर भारताने आपले लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. नद्यांच्या पाण्याच्या वाटपाविषयी भारतात अजूनही भांडणे होत असतात. नद्यांच्या पात्रांतून किती पाणी वाहते ह्याचे बरोबर मापन करण्याची साधने नसल्यामुळे अशा भांडणांचा उद्भव होतो. अनेक क्षेत्रात लागणारी मापनयंत्रे देशातच तयार करणे निकडीचे आहे. देशी मापनयंत्रे उपलब्ध होऊ लागली तर परदेशीय चलन तर वाचेलच पण ती तयार करण्याच्या प्रयत्नामुळे शास्त्रीय प्रगतीही होईल.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-२८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... रु. | १०·२२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस | ... रु. | १५·७८ ,, |
| ठेवी | ... रु. | ४४३·६२ ,, |
| खेळते भांडवल | ... रु. | ४८१·१५ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ वैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

### चीनविरुद्ध तळ मिळविण्याचे रशियाचे प्रयत्न

आशियातील राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळविण्यासाठी सध्या रशिया व चीन ह्यांच्यात स्पर्धा चाललेली आहे. ह्या स्पर्धेचा एक भाग म्हणून रशिया मलेशिया व सिंगापूर ह्या देशांतून एखादा तळ मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. एक वर्षापूर्वी रशियाच्या 'टास' ह्या वृत्तसंस्थेचा एक वार्ताहर मलेशियाला भेट देऊन गेला. आग्नेय आशियातील संपन्न देशांत प्रवास करण्यास परवानगी देण्यात आलेला रशियन कम्युनिस्ट पक्षाचा हा पहिलाच प्रतिनिधी होता. आता सिंगापूर येथे रशियाच्या वृत्तसंस्थेची एक कचेरीही उघडण्यात आली आहे. त्यानंतर रशियाचा एक व्यापारी प्रतिनिधीही ह्या भागात येण्याची खटपट करीत आहे. ह्या बाबतीत मलेशियाची प्रतिक्रिया लक्षात ठेवण्यासारखी आहे. रशिया हा मलेशियामधील रबराचा एक मोठा ग्राहक आहे. रशियाशी होणारे रबराचे सौदे ह्यापुढे आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत न करता थेट रशियाशीच करावे असे मत मलेशियात व्यक्त करण्यात येत आहे. पाश्चिमात्य देशांना अनुकूल असणाऱ्या आशियातील देशांना चीन धाकदपटशा दाखवीत आहे. उलट रशिया आपल्या व्यापाराची घडी मुकाट्याने बसवीत आहे.

### व्हिएटनाममधील युद्धातील अमेरिकेची मनुष्यहानी

व्हिएटनाममध्ये अमेरिकेने लष्करी कारवाई सुरू केल्यापासून अमेरिकेच्या लष्करातील मनुष्यहानी वाढत चालली आहे. १९६५ साली त्या मागील वर्षाच्या मानाने १ हजार टक्के अधिक अमेरिकन सैनिक रणांगणावर मारले गेले. गेल्या वर्षी व्हिएटनाममधील युद्धांत १,३६५ अमेरिकन सैनिक गारद झाले होते. त्यापूर्वीची दरसालची हानी शे-दीडशेपेक्षा अधिक नव्हती. १९६१ च्या प्रारंभापासून १६२० अमेरिकन सैनिकांची आहुती तेथील युद्धात पडली आहे. व्हिएटनाममधील संघर्ष थांबविण्यासाठी उत्तर व्हिएटनामने आधी दक्षिण व्हिएटनाममध्ये छुपे सैनिक पाठविणे बंद केले पाहिजे असे अमेरिका म्हणते; तर दक्षिण व्हिएटनाममधून अमेरिकेने आपले लष्कर आधी काढून घेतले पाहिजे अशी उत्तर व्हिएटनाम सरकारची अट आहे.

### "कोणत्याही व्यक्तीशी साम्य नाही"

एका नव्या लेखकाने आपले लिखाण एका मासिकाच्या संपादकाकडे पाठविले आणि त्या सोबतच्या पत्रात लिहिले, "ह्या गोष्टीतील सर्व व्यक्ती पूर्णपणे काल्पनिक आहेत; कोणत्याही दिवंगत अथवा जिवंत व्यक्तीशी त्यांचे यत्किंचितहि साम्य नाही."

काही दिवसांनी ते लिखाण परत आले. त्यावर संपादकाने लिहिले होते, "हेच तर त्यातले मुख्य वैगुण्य आहे."

### भरपूर खते वापरण्याचा सल्ला

पंजाबमधील तिघा शेतीतज्ज्ञांचे एक मंडळ जपानमधील शेतीचा अभ्यास करण्यासाठी गेले होते. त्यांनी आपल्या दौऱ्यात छोट्या शेतावरील कामाच्या यांत्रिकीकरणाचा व सामान्यपणे शेतीविकासाच्या तेथील कार्यक्रमाचा अभ्यास केला. मंडळाने पंजाब सरकारला केलेल्या शिफारशींत एक अशी आहे की ज्या शेतजमिनींना विहिरींचा पाणीपुरवठा होऊ शकेल अशा जमिनींतून वर्षात तीन पिके घेण्यात यावीत आणि त्यासाठी खतांचा वापर भरपूर प्रमाणात करण्यात यावा. शहरांच्या आसपास कोंबडी व डुकरे पाळण्याचा धंदा करण्यास आणि फळांची व भाजीपाल्याची लागवड करण्यास उत्तेजन देण्यात यावे असेही मंडळाने सुचविले आहे. जपानमधील अडीच एकराच्या शेतांतसुद्धा बरीच यंत्रसामग्री वापरण्यात येते. अशा प्रकारची यंत्रसामग्री पंजाबमधील छोट्या शेतांतूनही वापरता येईल असे मत मंडळाने व्यक्त केले आहे.

### राजस्थानमधील वीजपुरवठा

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत राजस्थानातील खेड्यांना व गावांना वीजपुरवठा करण्यासंबंधी जे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते ते आताच गाठण्यात आले आहे; इतकेच नव्हे तर ठरल्यापेक्षा तिप्पट अधिक ठिकाणांना विजेचा पुरवठा करण्यात येऊ लागला आहे. ह्या कार्यक्रमांत ३०३ ठिकाणांना वीजपुरवठा करण्यात यावयाचा होता. पण १९६५ अखेर ९४३ खेड्यांना व शहरांना विजेचा पुरवठा करण्यास प्रारंभ झाला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर राजस्थानातील १,०३८ विहिरींना पाणी उपसण्यासाठी विजेची सोय करण्यात आली होती. १९६५ अखेर विजेचा पुरवठा झालेल्या विहिरींची संख्या ६,००० पर्यंत वाढली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस अशा विहिरींची संख्या ८,००० पर्यंत वाढेल असा अंदाज आहे.

### सरकारी सेव्हिंग्ज बँक

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचे स्वतंत्र सरकारी सेव्हिंग्ज बँकेत रूपांतर करण्याचा सरकारचा विचार आहे. पोस्ट ऑफिसच्या कामातून सेव्हिंग्ज बँक वेगळी केल्यामुळे ती अधिक कार्यक्षम होईल अशी अपेक्षा आहे. सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचेही काम ही स्वतंत्र सेव्हिंग्ज बँक करील. ह्यासंबंधात तपशीलवार विचार करून अहवाल सादर करण्याचे काम चौघांच्या कमिटीकडे सोपविण्यात आले आहे.


एक चटई
अकरा मापे तेल
पाच जेवणे.....

पवढ्या "किमतीत" एक बैल विकला असं एका जुन्या इजिप्शिअन चित्रावरून दिसतं. पैशाचा शोध लागण्याआधी बार्टर (वस्तुचे चलन) व्यवहार होत असे. आता त्याऐवजी बहुतेक ठिकाणी पैशाचे चलन आणि त्याबरोबर बँका आहेत. बार्टर काळातील माणसामाणसामधील पूर्ण विश्वासाप्रमाणे बेळगाव बँक विश्वसनीय आहे.

शेड्यूल्ड बँक | दि बेळगांव बँक लिमिटेड | स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.
सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मुंबई ९

**आंतरराष्ट्रीय व्यापार परिषद्**—चालू वर्षाच्या अखेरीस बँकॉक येथे आंतरराष्ट्रीय आशियाई व्यापारी परिषद भरविण्यात येणार आहे. परिषदेंत भारताप्रमाणे बहुतेक आशियाई देश भाग घेणार आहेत. आशिया खंडात भरविण्यात येणारी ही सर्वात मोठी व्यापारी परिषद् आहे. आशियातील देशांचा जगातील इतर देशांशी होणारा व्यापार वाढविण्याच्या हेतूने परिषद् भरविण्यात येत आहे.

**अमेरिकेत मुलांची खरेदी-विक्री**—कुमार्गाला लागलेल्या मुलांसंबंधीच्या अमेरिकेच्या सिनेटच्या अहवालात दिलेल्या माहितीप्रमाणे अमेरिकेत दरसाल ४५ हजार मुलांची खरेदी-विक्री होत असते. त्यांच्या किंमती १ हजार डॉलर्सपासून १० हजार डॉलर्सपर्यंत असतात. लहान वयाचे गुन्हेगार अमेरिकेत वाढत असल्याचा हा परिणाम असावा.

**विमानांना लागणारे जळण**—एअर इंडिया विमान कंपनीला लागणाऱ्या उच्च दर्जाच्या तेलाच्या साठ्यापैकी ४० टक्के तेल भारत सरकारच्या मालकीची इंडिअन ऑइल कंपनी पुरविते. दिल्ली येथील पालम विमान तळावर कंपनी नुकतीच तेल पुरवू लागली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून मुंबई व कलकत्ता विमानतळावरील पुरवठाही कंपनीतर्फे करण्यात येऊ लागला आहे. मद्रासमधील पुरवठा अलीकडे ही कंपनीच करू लागली आहे.

**रेनॉल्ट कंपनीची तयारी**—भारतात मोटारींची जुळणी करणारे दोन कारखाने स्थापन करण्याची तयारी फ्रान्समधील रेनॉल्ट ह्या कंपनीने दाखविली आहे त्यापैकी एका कारखान्यात दरसाल २५ हजार मोटारी जुळविता येतील आणि दुसऱ्या कारखान्यात ५० हजार मोटारी जुळविता येतील. ह्या कंपनीच्या फ्रान्समधील कारखान्यात रोज ९०० मोटारींची जुळणी करण्यात येते. भारत सरकारच्या उपव्यापार मंत्र्यांनी अलीकडेच फ्रान्समधील कारखाना नजरेखालून घातला आहे.

**कॉफीच्या निर्यातीमुळे परदेशीय चलन**— चालू वर्षी कॉफीची निर्यात करून भारताला नेहमीपेक्षा २ कोटी रुपयाचे परदेशीय चलन अधिक मिळण्याची शक्यता आहे. कॉफीच्या निर्यातीत वाढ करण्यात आली असल्यामुळे चलन अधिक मिळणार आहे. कॉफीची निर्यात २१,६०० टनांपासून २६,००० टनांपर्यंत वाढविण्यात यावयाची आहे. निरनिराळ्या देशांनी करावयाची कॉफीची निर्यात आंतरराष्ट्रीय कॉफी कौन्सिलतर्फे ठरविली जात असते.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

new ATTRACTIVE rates of interest on deposits

| SAVINGS DEPOSITS | FIXED DEPOSITS | RECURRING DEPOSITS |
|---|---|---|
| 4 % | Maximum 7 5/8 % according to period | upto 6 % Period 24, 30, 36 months. + An Attractive Gift of a Ball Pen |

THE BANK OF MAHARASHTRA LTD

1177, Budhwar Peth, Poona 2

6520


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन दांडे यांनी छापिले व 'दुर्गाधिपाय' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.